# MT 154

**2017 .... .... 1100** **Seat No.**

**–MT 154 –SOCIAL SCIENCE (73) GEOGRAPHY & ECONOMICS (M) – SEMI PRELIM I– PAPER - B**

**Time : 2 Hours** **(Model Answer Paper)** **Max. Marks : 40**

| | | |
|---|---|---|
| उ.१. | **(अ) कंसातील योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.** | |
| (१) | अति पर्जन्याच्या क्षेत्रात **जांभी** मृदा तयार होते. | 1 |
| (२) | पश्चिम घाट आणि पूर्व घाट या **दख्खन** पठाराच्या सीमा आहेत. | 1 |
| (३) | पश्चिम घाटात **अन्नाईमुडी** हे सर्वाधिक उंचीचे शिखर आहे. | 1 |
| उ.१. | **(ब) 'अ' स्तंभ व 'ब' स्तंभ यांच्या योग्य जोड्या लावा.** | |
| (१) | चिंध्यांच्या बाहुल्या - इंदोर | 1 |
| (२) | हैद्राबाद - उर्दू | 1 |
| (३) | अगाती - विमानतळ | 1 |
| उ.२. | **(अ) खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा. (कोणतीही दोन)** | |
| (१) | १) दखखनच्या पठारावर नैसर्गिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्वाची अनेक पर्यटन स्थळे आहेत. उदा. तामिळनाडूमधील उदगमंडलम् (उटी) आणि महाराष्ट्रातील महाबळेश्वर ही प्रसिद्ध थंड हवेची स्थळे आहेत.<br>२) बेंगलुरु आणि हैद्राबाद ही उद्यानांसाठी प्रसिद्ध आहेत.<br>३) औरंगाबाद, बिदर, विजापूर, म्हैसूर, पुणे ही ऐतिहासिक शहरे आहेत. याशिवाय पठारी प्रदेशात जगभरातील लोकांना आकर्षित करणारी अनेक पवित्र स्थळे आहेत. | 2 |
| (२) | १) छोटा नागपूर पठारावर खनिजांचा प्रचंड साठा आहे. उदा. अभ्रक, बॉक्साइट, तांबे, चुनखडक, लोहखनिज आणि कोळसा.<br>२) दामोदर खोरे हे कोळशाच्या खाणींसाठी प्रसिद्ध आहे आणि स्वयंपाकासाठी लागणाऱ्या कोळशाचे देशातील प्रमुख उत्पादन केंद्र म्हणून हा प्रदेश ओळखला जातो.<br>३) दामोदर नदीच्या खोऱ्यात झारिया, राणिगंज, पूर्व व पश्चिम बोकारो आणि रामगड ही प्रमुख कोळसा क्षेत्रे आहेत.<br>४) मध्यवर्ती खोऱ्यात कोळशाचे प्रचंड साठे सापडले आहेत.<br>५) म्हणून छोटा नागपूरच्या पठारावर खाणकाम चांगल्या रितीने विकसित झाले आहे. | 2 |

| | | |
|---|---|---|
| (३) | १) कारण वनस्पती आणि प्राणीजीवन यांची उत्क्रांती एकांत वातावरणात होते.<br>२) अनेक दूरवरच्या बेटांवर जगातील दुर्मिळ वनस्पती सापडतात, काही ठिकाणी वृक्षांच्या आणि प्राण्यांच्या अशा जाती आहेत की, त्या इतरत्र कुठेही सापडत नाहीत.<br>३) म्हणून, लक्षद्वीप बेटांवरील पारिस्थितीकी अत्यंत नाजूक आणि अद्वितीय आहे. | 2 |
| उ. २. | **(ब) थोडक्यात टीपा लिहा. (कोणत्याही दोन)** | |
| (१) | १) वस्त्रोद्योग हा माळवा प्रदेशातील एक प्रमुख उद्योग आहे.<br>२) वस्त्रोद्योगाच्या मोठ्या वसाहती इंदोर आणि उज्जैन येथे आहेत.<br>३) आदिवासी लोकांसाठी हस्तकलेच्या वस्तू हे उपजीविकेचे साधन आहे.<br>४) रतलामचे लाखकाम, इंदोर येथे तयार होणाऱ्या चिंध्यांच्या बाहुल्या आणि इंदोर, उज्जैन व इतर अनेक केंद्रांवर तयार होणाऱ्या कागदाच्या लगद्यापासून बनणाऱ्या वस्तू सर्वत्र प्रसिद्ध आहेत.<br>५) अनेक मोठ्या आणि मध्यम उद्योगधंद्यांची केंद्रे विकसित झाली आहेत.<br>६) इंदोरला डिझेल इंजिन तयार करण्याचा मोठा उद्योग आहे.<br>७) इंदोरजवळील पितमपूर येथे गाड्या तयार करणाऱ्या उद्योगांचे मोठ्या प्रमाणावर केंद्रीकरण झाल्यामुळे ते औद्योगिक शहर म्हणून ओळखले जाते.<br>८) इंदोर हे शहर मध्य प्रदेशचे व्यापारी केंद्र म्हणून ओळखले जाते आणि ते वस्त्रोद्योग आणि शेतीवर आधारित उत्पादनांचे प्रमुख केंद्र आहे. | 2 |
| (२) | १) भारतात गुजरात राज्याला सर्वात लांब सागरी किनारा लाभला आहे.<br>२) कच्छमध्ये सपाट जमीन आहे. तेथे काही मध्यम उंचीच्या टेकड्या आढळतात. मात्र, अधिकांश भूभाग दलदलीचा आहे.<br>३) रण आणि काठीयावाड द्वीपकल्पाच्या मधील हा समुद्राचा उथळ भाग आहे.<br>४) याठिकाणी अनेक बेटे आहेत. त्यातील काही प्रवाळ खडकांच्या रुपात आहेत.<br>५) कच्छच्या आखातात सागरी राष्ट्रीय उद्यान विकसित केले आहे.<br>६) गुजरातच्या किनाऱ्यावरील आणखी एक मोठे आखात म्हणजे खंबातचे आखात आहे. हे आखात काठियावाड द्वीपकल्पाला दक्षिण गुजरातपासून अलग करते.<br>७) या आखातात साबरमती, नर्मदा आणि तापी या मोठ्या नद्या येऊन मिळतात. | 2 |
| (३) | १) पठारी प्रदेशात व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जात असल्याने त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात जल आणि मृदा प्रदूषण होत आहे.<br>२) जमिनीतून खनिज काढल्यानंतर सदर प्रदेश इतर बाबींसाठी निरुपयोगी ठरतो.<br>३) या प्रदेशात उद्योगधंद्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे येथे हवा आणि पाणी यांचेही प्रदूषण होत आहे.<br>४) पठारी प्रदेशाचा पश्चिम भाग हा भूकंपप्रवण क्षेत्र आहे.<br>५) १९९३ साली झालेल्या लातूरमधील भूकंपामुळे अनेक लोक मृत्युमुखी पडले व मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली, कोयना धरणाचा परिसर हा देखील भूकंपप्रवण क्षेत्र आहे. | 2 |

उ. ३. (अ) खालील सांख्यिकीय माहितीच्या आधारे विभाजित आयत तयार करा. **2**




उ. ३. **(ब) खालील नकाशाचे वाचन करुन त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

(१) गोदावरी, कृष्णा, भीमा या महाराष्ट्र पठारावरील प्रमुख नद्या आहेत. **1**

(२) महाराष्ट्र पठारावरील तापी व पूर्णा या पश्चिम वाहिनी नद्या आहेत. **1**

(३) कर्नाटक पठारावर निलगिरी व शेवरॉय टेकड्या आहेत. **1**

(४) भीमा नदी ही कृष्णा नदीची उपनदी आहे. **1**

उ. ३. (क) तुम्हांस पुरविलेल्या भारताच्या आराखड्यात पुढील घटक दाखवा, तसेच त्यांची नावे द्या व चिन्हांची सूची द्या. (कोणतेही दोन) **2**




उ. ४. **खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

(१)
१) पश्चिम प्रदेशात लोकसंख्येची घनता, कमी आहे. **4**
२) लोकसंख्या बहुतेक छोट्या-छोट्या गावांमधून आणि विखुरलेल्या वाड्यां-वस्त्यांमधून ती विभागली गेली आहे.
३) पश्चिम घाटात आदिवासींची लोकसंख्या जास्त आहे आणि ती पश्चिम घाटात सर्वत्र पसरलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| | ४) त्यांच्यातील अधिकतर लोक उदरनिर्वाहासाठी वनांवर अवलंबून आहेत.<br>५) बरेचसे आदिवासी आता हळूहळू शेतीकडे वळू लागले आहेत.<br>६) महाराष्ट्रात भिल्ल आणि वारली या आदिवासी जमाती आहेत.<br>७) कर्नाटकात तोडा आणि केरळात कोरागा अशा आदिवासी जमाती आहेत.<br>८) घाट विभागात शहरीकरणाचे प्रमाण खूप कमी आहे. काही थोडी पर्यटनस्थळे आहेत, मात्र अरबी समुद्राच्या लगत असलेल्या किनारी प्रदेशात लोकसंख्येची घनता जास्त आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे किनाऱ्यालगत बंदरांची स्थाने शहरे म्हणून विकसित झाली आहेत.<br>९) मुंबई आणि त्याच्या शेजारील किनारी जिल्हे ठाणे आणि रायगड, गुजरातमध्ये सुरत येथे लोकसंख्येची घनता अधिक आहे. | |
| (२) | १) या प्रदेशातील मुख्य पर्यावरणीय समस्या ह्या वृक्षतोड, खाणकाम, औद्योगिकीकरण, वीजनिर्मिती, शहरीकरण, वाहनांची वर्दळ आणि विकास प्रकल्प या बाबींशी संबंधित आहेत.<br>२) या प्रदेशातील वनांची संख्या बेसुमार वृक्षतोडीमुळे घटत आहे.<br>३) विकास प्रकल्प, खाणकाम आणि वाहतुकीचा विकास यामुळे बहुमूल्य हजारो हेक्टर वनांचा बळी गेला आहे. काही मौल्यवान वने शेतीच्या विस्तारामुळे नष्ट झाली आहेत.<br>४) द्विपकल्पीय उच्चभूमी हे भारताच्या खनिजसंपत्तीची आणि इंधनस्त्रोतांची भांडारे आहेत.<br>५) सुस्पष्ट खाणकाम धोरण नसल्याने खाणमालक पर्यावरणाचा ऱ्हास करीत आहे.<br>६) खाण बंद करण्यापूर्वी किंवा दुसरीकडे जाण्यापूर्वी जमीन पुन्हा पूर्वीसारखी सपाट करण्याला किंवा नवीन वृक्षांची लागवड करण्याला ते बांधील नाहीत.<br>७) खाणींच्या जवळ राहणाऱ्यांच्या तब्येतीवर खनिजांचे कण, धूळ, स्फोट, खाणीतील आगी इ.चे दुष्परिणाम होतात.<br>८) या प्रदेशात अनेक औष्णिक प्रकल्प, कोळसा प्रकल्प आहेत. विद्युत प्रकल्पातून निघालेले टाकाऊ पदार्थ, आजूबाजूचे जलस्त्रोत आणि जलसाठे प्रदूषित करतात. | 4 |
| (३) | १) द्वीपकल्पीय पठाराचा विस्तार मोठा असल्याने हवामानातही विविधता आढळते.<br>२) द्वीपकल्पाच्या अधिकांश पठारी भागात उष्णकटिबंधीय प्रकारचे हवामान आढळते.<br>३) हिवाळा आणि उन्हाळ्याच्या सुरुवातीचा दीर्घ कालावधी कोरडा असतो, त्यावेळी तापमान १८° से. पेक्षा जास्त असते, उन्हाळा हा फार उष्ण असतो आणि अंतर्भागातील प्रदेशात तापमान ४५°से. पेक्षाही जास्त असू शकते.<br>४) पावसाळा जून ते सप्टेंबर दरम्यान असतो आणि सरासरी वार्षिक पर्जन्यमान सुमारे ७५० ते १५०० मिमी. दरम्यान असते.<br>५) फक्त तामिळनाडूचा मध्य-पूर्व भाग या पट्ट्यात ईशान्य मोसमी वाऱ्यामुळे हिवाळ्यात पाऊस पडतो.<br>६) कर्कवृत्ताच्या दक्षिणेकडील आणि पश्चिम घाटाच्या पूर्वेकडील भाग आणि निलगिरी पर्वताचा भाग हा मोठा पट्टा उष्णकटिबंधीय निम-शुष्क प्रकारचे हवामान अनुभवतो.<br>७) यामध्ये कर्नाटक तामिळनाडूचा पश्चिम आणि अंतर्गत भाग, पश्चिम आंध्र प्रदेश आणि मध्य महाराष्ट्र इत्यादी भागाचा समावेश होतो. | 4 |

| | | |
|---|---|---|
| | ८) हा दुष्काळप्रवण भाग असून येथे अनिश्चित स्वरुपाचा पाऊस पडतो.<br>९) येथे वार्षिक पर्जन्यमान सरासरी ४०० ते ७५० मिमी. आहे.<br>१०) मार्च ते मे हा उन्हाळ्याचा काळ असतो आणि सरासरी तापमान सुमारे ३२° से. असते. | |
| | **अर्थशास्त्र** | |
| उ.५. | **कंसातील योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.** | |
| (१) | दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना **पिवळ्या** रंगाची शिधापत्रिका असते. | 1 |
| (२) | आर्थिक प्रश्न मुख्यतः साधनांच्या **दुर्मिळतेमुळे** निर्माण होतो. | 1 |
| उ.६. | **खालील प्रश्नांची प्रत्येकी एक किंवा दोन वाक्यांत उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** | |
| (१) | १) जून १९९७ पासून लक्ष्याधारित सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत दुहेरी किंमत रचना सुरु करण्यात आली.<br>२) यानुसार दारिद्र्य रेषेवरील कुटुंबांसाठी वाजवी किंमतीत तसेच दारिद्र्य रेषेखालील कुटुंबासाठी अतिशय कमी किंमतीत धान्याचे वितरण करण्याचे लक्ष्य निश्चित केले आहे. | 2 |
| (२) | उत्पादन तंत्राची निवड यंत्रसामुग्री, श्रम, अवजारे या घटकांची उपलब्धता व त्यांच्या तुलनात्मक किंमती यावर अवलंबून असते. | 2 |
| (३) | १) गरीब जनतेला सवलतीच्या दरात धान्यपुरवठा करण्यासाठी ती उपयुक्त ठरते.<br>२) शिधावाटप दुकानदार, त्यांचा नोकरवर्ग आणि इतर संबंधित कामगारांना रोजगार मिळतो.<br>३) दारिद्र्य आणि आर्थिक विषमता कमी होण्यास मदत मिळते. | 2 |
| (४) | अर्थव्यवस्थेच्या मूलभूत समस्या पुढीलप्रमाणे :<br>१) उत्पादन कशाचे करावे?<br>२) उत्पादन कसे करावे?<br>३) उत्पादन कोणासाठी करावे?<br>४) उत्पादन किती करावे?<br>५) उत्पादन कोणाकडून करावे?<br>६) साधन सामग्रीचा कितपत कार्यक्षम वापर होत आहे? | 2 |
| (५) | केंद्र व राज्य या सरकारद्वारे सार्वजनिक वितरण प्रणालीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी विभागून घेतली जाते. | 2 |
| उ.७. | **खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर पाच ते सहा ओळींत लिहा.** | |
| (१) | अन्नभेसळ म्हणजे अन्नपदार्थांची गुणवत्ता कमी करणारे व त्यांचे प्रमाण वाढवणारे घटक त्यात मिसळण्याची प्रक्रिया होय. नफ्याचे प्रमाण वाढवणे हे भेसळीमागचे मुख्य कारण असते. | 4 |

| | | |
|---|---|---|
| | १) काही भेसळीचे घटक दृश्य स्वरूपाचे असतात. उदा. खडे, पाने, माती इत्यादी. ग्राहक ते काढून टाकू शकतात.<br>२) परंतु काही भेसळीचे घटक अदृश्य असतात. उदा. दुधात पाण्याची किंवा रसायनांची भेसळ करणे. डाळींना कृत्रिम रंग लावणे इत्यादी. ते सहजरित्या काढून टाकता येत नाहीत, म्हणून आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. उदा. कर्करोग, पक्षघात, त्वचेचे व डोळ्यांचे विकार इत्यादी. काहीवेळा मृत्यूदेखील ओढवतो.<br>३) अन्नभेसळीचा समाजाच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतो. त्यामुळे हा एक गंभीर स्वरुपाचा सामाजिक गुन्हा आहे. म्हणूनच सुदृढ आणि सशक्त भारतासाठी अन्नभेसळ रोखणे ही आपणा सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. | |
| (२) | १) भांडवलशाही अर्थव्यवस्थेत काय आणि किती खरेदी करावे याच्या निवडीचे स्वातंत्र्य उपभोक्त्याला असते.<br>२) उत्पादकाला व्यावसायिक स्वातंत्र्य असते.<br>३) उत्पादन आणि वितरणासंबंधीचे निर्णय मागणी व पुरवठ्यातील बदलानुसार घेतले जातात.<br>४) महत्तम समाधान मिळवण्यासाठी उत्पादक अतिशय कार्यक्षम उत्पादन तंत्र स्वीकारतात.<br>५) आर्थिक उपक्रमांमध्ये सरकारी हस्तक्षेप नसतो. उदा. अमेरिकेची संघराज्ये.<br><br>❖❖❖❖ | 4 |